# CLC INDUSTRIES LIMITED

*(Formerly known as Spentex Industries Limited)*

**Date:21st May, 2026**

**To,**

**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza,
Bandra Kurla Complex, Bandra (East),
Mumbai – 400051Maharashtra, India.
**Symbol:** CLCIND

**BSE Limited**
Listing Compliance Department
Floor 25, P J Towers,
Dalal Street, Mumbai – 400001
Maharashtra, India.
**Scrip Code:** 521082

**Sub.: NEWSPAPER CUTTING U/R 30 OF THE SEBI (LODR) REGULATIONS, 2015**

**REF: PUBLICATION OF FINANCIAL RESULTS U/R 33 OF THE SEBI (LODR) REGULATIONS, 2015**

Dear Sir / Madam

With respect to above subject, this is to inform the Stock Exchanges that pursuant to Regulation 30, 33 and 47 read with Part A (12) of Schedule III of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015 and in continuation to our letter dated 20th May 2026 with regard to outcome of Board meeting held on 20th May, 2026 the extracts of audited Financial Results for the 4th quarter & financial year ended on 31st March 2026 was published for the information of Shareholders in Lok Satta (Marathi)–Chh.Sambhajinagar & The Indian Express (English) on 21st May, 2026.

Copy of newspapers clippings in this connection are attached.

You are requested to kindly take the above information on record.

Thanking you.

Yours Faithfully,
**For CLC Industries Limited**

KOYAL GEHANI

**Koyal Gehani**
**Company Secretary & Compliance Officer**
**Membership No-A-45277**
Encl: As above

**Registered office Address:** Plot No.-318, N-3, CIDCO, Near Punjab National Bank, Chh. Sambhajinagar-431001, Maharashtra | **Phone:** 0240-6608636 |
**Email Id:** companysecretary@clcindustries.com
**GSTN**: 27AABCS4997E2Z0 | **Website:** www.clcindia.com |**CIN:** L74899MH1991PLC457161

# इंधन टंचाईची झळ; वाहनधारकांची धावपळ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी :** पेट्रोलपंपावर मंगळवारपासून वाहनधारकांची गर्दी पुन्हा उसळल्याचे चित्र मराठवाड्यातील बहुतांश भागात दिसून येत आहे. छत्रपती संभाजीनगरमध्येही अनेक पेट्रोल पंपांवर चारचाकी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तर, जालना जिल्ह्यात १७० पेट्रोलपंप असून, त्यांपैकी ४८ पंपांवर पेट्रोल-डिझेल संपल्याचे फलक लागले आहेत. त्यामुळे जेथे पेट्रोल आहे तेथे मंगळवारी रात्री उशिरापर्यंत गर्दी झाली होती.

जालना जिल्ह्यातील काही पेट्रोलपंपांवर इंधनाचा साठा उपलब्ध नसला, तरी जनतेने अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच पुरवठा सुरळीत ठेवण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत, असे जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे. काही पंपांवर साठा तात्पुरता उपलब्ध नसल्याने ते बंद ठेवण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण होत असून, अनेक वाहनधारक आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात पेट्रोल व डिझेल भरून घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता जिल्हा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## जिल्हा पुरवठा अधिकारी काय म्हणतात?

दररोज बंद आणि सुरू असलेल्या पेट्रोल पंपांचा अहवाल, उपलब्ध इंधन साठ्याची माहिती आणि करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल प्रशासनाकडे सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आणि आवश्यकतेपुरतेच इंधन खरेदी करण्याचे आवाहन केले असून, जिल्ह्यात इंधनपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.

**– सुकेशिनी पगारे,** जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना

# जालन्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेची कूर्मगती

**जालना :** नवीन सूक्ष्म आणि लघु उद्योग उभारणीसाठी असलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमइजीपी) अंतर्गत बँकांकडे दाखल जवळपास ८० टक्के प्रस्ताव नामंजूर झालेले आहेत. जिल्ह्याचा २०२६-२०२७ च्या वार्षिक पतआराखड्याच्या निमित्ताने आयोजित जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

या योजनेसह प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या अर्जदारांना योग्य मार्गदर्शन करावे आणि किरकोळ कारणांमुळे हे अर्ज नामंजूर करू नयेत, अशी सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी बँकांच्या अधिकाऱ्यांना केली. जिल्हा उद्योग केंद्र आणि बँकांनी समन्वयाने काम करून प्रस्ताव नामंजूर होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याची सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी केली.

२०२६-२०२७ आर्थिक वर्षासाठी ८ हजार ५१५ कोटी रुपयांच्या पतपुरवठा आराखडा पुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. यामध्ये पीक कर्जासाठी १ हजार ८२० कोटी तर कृषी क्षेत्रासाठी एकूण ३ हजार ५२ कोटी रुपयांचा समावेश आहे. तर सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्राठी २ हजार २२० कोटी रुपये तरतूदचा समावेश आहे. प्रस्तावित पीक कर्जमाफी योजनेच्या पार्श्वभूमीवर सर्व बँकांनी आवश्यक पूर्वतयारी करायची सूचना जिल्हाधिकारी यांनी केली.

## शिवसेनेचे नगरसेवक बैलगाडीतून मनपात

छत्रपती संभाजीनगर : बळीराजाला शेती मशागतीसाठी डिझेल मिळत नसल्यामुळे इंधन बचतीच्या निषेधार्थ महापालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नगरसेवक बुधवारी बैलगाडीतून पोहोचले. भडकलगेट येथून तीन बैलगाड्यांतून सात नगरसेवक सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत महापालिकेच्या प्रवेशद्वारावर पोहोचले. मात्र, त्यांच्या बैलगाड्या पोलिसांनी अडवल्या. गटनेते गणेश लोखंडे यांच्यासह रशीद मामू, सचिन खैरे, हनुमान शिंदे, सुनीता सोनवणे, सावित्री वाणी, वैशाली कोरडे या नगरसेवकांसह राहुल सोनवणे, रामेश्वर कोरडे हे घोषणाबाजी करीत मनपापर्यंत दाखल झाले.

## डॉ. कुमुद गोसावी यांचे निधन

**पुणे :** संतसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. कुमुद गोसावी (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने मंगळवारी निधन झाले. त्यांच्यामागे मुलगी, सून आणि नातवंडे असा परिवार आहे. गोसावी यांच्या पार्थिवावर बुधवारी (२० मे) वैकुंठ स्मशानभूमीत सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



मूळ छत्रपती संभाजीनगरच्या असलेल्या डॉ. गोसावी यांचा संत एकनाथ महाराजांवर विशेष अभ्यास होता. त्यांनी तीसहून अधिक ग्रंथ लिहिले असून, संत एकनाथ महाराज यांच्यावरील 'एकोबा' आणि त्यांच्या पत्नी यांच्यावरील 'गिरिजा' या चरित्रात्मक कादंबऱ्या विशेष गाजल्या.

संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. यू. म. पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली कुमुद गोसावी यांनी नाथ महाराजांवर प्रबंध सादर केला.

---

**फॉर्म नं. ३**
**[विनियम - १३ (१) (ए) पाहा]**
**ऋण वसुली न्यायाधिकरण**
**औरंगाबाद**

तळमजला, जीवन सुमन एलआयसी बिल्डिंग, प्लॉट नं. ३, एन-५, सिडको, औरंगाबाद - ४३१००३.
प्रकरण क्र. ओए/५५७/२०२४
ऋण वसूली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, १९९३ च्या नियम ५ च्या पोट–नियम (२ए) यासह वाचलेल्या, कायद्याच्या कलम १९ च्या पोट–कलम (४) अंतर्गत समन्स.

**एक्झि. नं. १०**
**आयसीआयसीआय बँक लिमिटेड**
**विरुद्ध**
**अकिल रौफ शेख**

**प्रति,**
**(१) अकिल रौफ शेख**
निवासी पत्ता – २८, सारा सिटी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र

**समन्स**

**ज्याअर्थी,** प्रकरण ओए/५५७/२०२४ माननीय पीठासीन अधिकारी/ रजिस्ट्रार यांच्यासमोर २३.०४.२०२६ रोजी सूचीबद्ध झाले होते.

ज्याअर्थी या माननीय न्यायाधिकरणाने रु. ३७,२१,२३९/– च्या (जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती, इ. सह अर्ज) ऋणांच्या वसूलीकरिता तुमच्या विरोधात फाईल केलेला (ओए), कायद्याच्या कलम १९(४) अंतर्गत उक्त अर्जावर समन्स/ नोटीस जारी करण्यास सहमती दर्शवली आहे.

कायद्याच्या कलम १९च्या पोट–कलम (४)च्या अनुसार, तुम्हास, प्रतिवादींना खालीलप्रमाणे निदेशीत करण्यात आले आहे:–

(i) विनंती अर्जास का मंजुरी देण्यात येऊ नये याकरिता समन्स सेवेच्या तीस दिवसांच्या आत कारण दाखवा;

(ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत अर्जदाराद्वारा विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता किंवा मत्तेखेरीज अन्य मालमत्तेचा तपशील जाहीर करणे;

(iii) तुम्हास मालमत्तेच्या जप्तीकरिता अर्ज निकालात काढणे व प्रलंबित सुनावणी, मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेली सदर अन्य मत्ता व मालमत्ता किंवा सुरक्षित मत्ता जाहीर करणे किंवा सदर मालमत्तेशी व्यवहार करणे यापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे;

(iv) तुम्हास न्यायाधिकरणाच्या पूर्व–संमतीशिवाय मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत मालमत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने, मत्तेच्या कोणत्याही त्याच्या सामान्य व्यवसायाखेरीज, ज्याकरिता सुरक्षा हिताची निर्मिती करण्यात आली आहे आणि/ किंवा अन्य मत्ता व विनिर्दिष्ट मालमत्तेचे हस्तांतरण करता येणार नाही किंवा मालमत्तेची वासलात लावता येणार नाही.

(v) तुम्ही सामान्य व्यवसायातील सुरक्षित मत्ता किंवा अन्य मत्ता आणि मालमत्तेच्या विक्रीद्वारा पूर्तता होत असलेल्या विक्री प्रक्रियेकरिता पात्र असणार आहात आणि सदर प्रक्रियेमार्फत निघालेली रक्कम सदर मत्तेची सुरक्षा हित असलेल्या बँक किंवा वित्तिय संस्थांकडे असलेल्या खात्यात जमा करू शकाल.

तुम्हास अर्जदाराकरिता सादर केलेल्या त्याकरिता एका प्रतीसमवेत लेखी विवरण फाईल करण्यास आणि १६.०७.२०२६ रोजी स. १०:३० वा. रजिस्ट्रारच्यासमोर हजर राहण्यास सुद्धा निदेशीत करण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी करण्यात येईल व निर्णय घेतला जाईल.

आज दिनांक ०५.०५.२०२६ रोजी माझ्या हस्ते आणि या न्यायाधिकरणाच्या मोहोरनिशी दिलेले.

रजिस्ट्रार,
ऋण वसूली न्यायाधिकरण
औरंगाबाद

---

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

### व्यवसाय

**कार** टेम्पो रेंटवर लावा इन्कम सोर्स वाढवा. तरुणांनो कमीतकमी खर्चात ॲग्रोफूड स्वउद्योगात सामील व्हा. दररोजच रोखीत पैसे कमवा. सिनिअर सिटीझन यांना दरमहिना उत्पन्नाचे साधन मिळवा. संपर्क : 8446210748/ 7021098700.
0071036510-1

### जागासंबंधी

**मुंबई** पुण्याजवळचं आमच्याकडून हाउसिंगयोग्य तसेच ॲग्रोटुरिस्ट प्लॉट मिळवा ग्रोथ वाढवा तुमचा फार्म पडून असल्यास इन्कम सोर्ससाठी 8446210748/ 9503473953.
0071036518-2

### यात्रा विशेष

**दोस्तीटूर- आदिकैलाशयात्रा, चारधामयात्रा, नर्मदा परिक्रमायात्रा, कुरवपूर- पिठापूरयात्रा, श्रीदत्तधाम परिक्रमा, अमरनाथयात्रा, नैनिताल, लेह- लडाख, त्रिस्थळी- अयोध्यायात्रा, कोस्टल कर्नाटका, सिक्कीम- दार्जिलिंग, भूतान. 9594880123/ 9702251584.**
0070987728-16

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

---

## आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड

IDFC FIRST Bank

(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)
CIN : L65110TN2014PLC097792
नोंदणीकृत कार्यालय: केआरएम टॉवर्स, आठवा मजला, हॅरिंगटन रोड, चेटपेट, चेन्नई– ६०००३१.
टेलि. : +९१ ४४ ४५६४४००० | फॅक्स: +९१ ४४ ४५६४४०२२

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार व सह–कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** कडून खाली नमूद सुरक्षित कर्जे घेतली होती. खाली नमूद कर्जदार व सह–कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तांचे तारण ठेवून सुरक्षित करण्यात आले होते. ते संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन करण्यात असमर्थ ठरल्याने व ते अनियमित झाल्याने त्यांची कर्जे आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आलेली आहेत. खालील तक्त्यात जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार त्यांना **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना देय असणाऱ्या संबंधित रकमा देण्यात आलेल्या आहेत आणि त्यांवर पुढील व्याजही लागू असेल आणि हे व्याज त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील दराने आकारण्यात येईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार व सह–कर्जदाराचे नाव | अनुच्छेद १३(२) सूचना दिनांक | अनुच्छेद १३(२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७९०९७७०५ आणि १४१४८०१७६ | मालमत्तेवरील कर्ज | १. गणेश अर्जुन पाटील<br>२. रुपाली गणेश पाटील | १३.०४.२०२६ | रु. १६,९०,४८०.१६/– |

**मालमत्तेचा पत्ता**– प्लॉट क्र. १, क्षेत्रफळ सुमारे ५४०.९० चौ.मी., गट क्र. ६०, विरावली, ता. यावल, जळगाव, महाराष्ट्र, आणि सदर **मालमत्तेच्या चतु:सीमा: पूर्वेस**– २४ मीटर रस्ता, **पश्चिमेस**– प्लॉट क्र. १७, **उत्तरेस**– मोकळी जागा, **दक्षिणेस**– १२ मी. रस्ता.

याद्वारे आपणांस सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडशी विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते) यांना आपणाकडून घेणे असलेल्या रकमेचा त्यांच्या संबंधित दिनांकापासूनच्या कंत्राटी दरावरील व्याजासह आणि इतर खर्च व शुल्कांसह भरणा करण्याचे आवाहन करण्यात येते. असे न केल्यास निम्नस्वाक्षरीकारांना आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते) यांना घेणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी वर नमूद तारण मालमत्तेविरुद्ध सर्फेसी अधिनियमाच्या अनुच्छेद १३(४) व १४ अंतर्गत नाइलाजाने पावले उचलावी लागतील. याशिवाय आपणांस सदर अधिनियमाच्या अनु. १३(१३) अंतर्गत सदर अनामत मत्तेचे विक्री/ भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही पद्धतीने हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

**स्वा/–, प्राधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)**

**दिनांक:** २१.०५.२०२६
**स्थान:** जळगाव, महाराष्ट्र

---

## जेएम फायनान्शियल होम लोन्स लिमिटेड

JMFinancial HOME LOANS

CIN : U65999MH2016PLC288534
कॉर्पोरेट कार्यालय : तिसरा मजला, सुआशिष आयटी पार्क, प्लॉट नं. ६८ई, दत्त पाडा रोडलगत, टाटा स्टिलसमोर, बोरिवली (पूर्व), मुंबई–४०००६६.

### मागणी सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ ("रुल्स")च्या रुल ३ यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("ॲक्ट")च्या सेक्शन १३ (२) अंतर्गत.**

ज्याअर्थी, **जेएम फायनान्शियल होम लोन्स लिमिटेड**चे ("**जेएमएफएचएलएल**") प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी ॲक्ट अंतर्गत आणि ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत याआधीच निर्गमित केलेल्या सविस्तर दिनांकित मागणी सूचनांच्या रुल्सच्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत, याखाली सविस्तररीत्या दिल्यानुसार संबंधित सूचनेच्या तारखेपासून **६० दिवसांच्या** आत, संबंधित **मागणी सूचने**मध्ये नमूद केलेल्या रकमेचे प्रदान करण्याकरिता याखालील सूचीबद्ध ऋणको/ सह–ऋणको/ हमीदार (सर्व "बंधनकारक"/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी" यांना एकत्रित किंवा वैयक्तिकरीत्या संदर्भित) यांना फर्माविण्यात आले आहे. उक्त सूचनांच्या प्रती रजिस्टर्ड पोस्ट ए. डी. द्वारा पाठविण्यात आल्या आहेत आणि निम्नस्वाक्षरीकाराकडे उपलब्ध आहेत, आणि उक्त "बंधनकारक/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी", जर ते इच्छुक असल्यास, सामान्य कार्यालयीन वेळेत कामाच्या कोणत्याही दिवशी निम्नस्वाक्षरीकाराकडून गोळा करू शकतील.

वरील संबंधित याद्वारा पुन्हा एकदा सूचना देण्यात येते की, उक्त बंधनकारक/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधींनी उक्त बंधनकारकाद्वारा निष्पादित अन्य कागदपत्रे/ लेखन, जर असल्यास आणि कर्ज करारनाम्यासह वाचलेल्या, प्रदान आणि/ किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत खालील रकान्यामध्ये नमूद केलेल्या संबंधित तारखांपासून खाली सविस्तररीत्या दिल्यानुसार पुढील व्याजासह एकत्रित, त्यांच्या संबंधित नावांच्या अनुसार याखाली दर्शविलेली रक्कम संबंधित सूचनांच्या तारखांपासून ६० दिवसांच्या आत "**जेएमएफएचएलएल**"ला प्रदान करावी. कर्जाच्या देय रकमेच्या परतफेडीकरिता सुरक्षा म्हणून अनुक्रमे उक्त बंधनकारकाद्वारा "**जेएमएफएचएलएल**"कडे खालील सुरक्षित मत्ता गहाण ठेवण्यात आलेली आहे.

| अनु. क्र. | ऋणको/ सह–ऋणको/ हमीदाराचे नाव व एलएएन | मालमत्तेचे वर्णन | सूचना १३(२) तारीख/ एनपीए तारीख/ तारखेनुसार एकूण थकित रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १. श्री. अरुण एकनाथ महाजन<br>२. श्रीमती शितल अरुण महाजन/<br>लोन अकाउंट नंबर :<br>HJAL18000001040 &<br>LJAL18000001018 | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे – तीन मजली इमारत असलेला तिचा ग्रामपंचायत हाऊस मालमत्ता क्र. ४३ (दुरुस्ती करार नं. ३८७/ २०१६ नुसार) व सीटीएस नं. १२८, मोजमापाची ३०.५ चौ.मी. व येथे स्थित – कर्ज्योत, ता. रावेर, जि. जळगाव, ग्रामपंचायत कर्ज्योत जळगावच्या मर्यादेत, रावेर, महाराष्ट्र, पिनकोड – ४२५५०८. सीमा (विक्री विलेख नं. ८२/ २०१३ नुसार) :- पूर्व – रोड, पश्चिम – रोड, उत्तर – रोड, दक्षिण – मधुकर भिका महाजन यांचे हाऊस. सीमा (दुरुस्ती करार नं. ३८७/ २०१६ नुसार) :- पूर्व – सीटीएस नं. १३४, पश्चिम – रोड, उत्तर – सीटीएस नं. १२७, दक्षिण – सीटीएस नं. १२९. | १. ०८.०५.२०२६<br>२. ०७.०५.२०२६<br>३. रु. १५,२९,८२४/– (रुपये पंधरा लाख एकोणतीस हजार आठशे चोवीस फक्त) ०७–मे–२०२६ रोजीप्रमाणे थकित |
| २. | १. श्री. दिलीप जोरसिंह जाधव<br>२. श्रीमती निता दिलीप जाधव<br>३. श्री. संजय मुलचंद पवार/<br>लोन अकाउंट नंबर :<br>HDHL22000019955 | मालमत्ता येथे स्थित – दालवेल, ता. परोला व जि. जळगाव, महाराष्ट्र, पिनकोड – ४२५१११, असलेला जीपीएच नं. ४६५/२, असलेला प्लॉट एरिआ ४४८ चौ.फू. त्यावरील सद्य व भावी सर्व बांधकामासह, उक्त जमीन पुढीलप्रमाणे सिमित – उक्त मालमत्तेच्या सीमा :– पूर्व – ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ४६४, दक्षिण – ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ४६५/१, पश्चिम –रोड, उत्तर – रोड. | १. ०८.०५.२०२६<br>२. ०७.०५.२०२६<br>३. रु. ५,५८,२८०/– (रुपये पाच लाख अट्ठावन्न हजार दोनशे ऐंशी फक्त) ०७–मे–२०२६ रोजीप्रमाणे थकित |
| ३. | १. श्री. अशोक भगतसिंह मर्मत<br>२. श्रीमती सरलाबाई अशोक परदेशी<br>३. श्री. सरदार रुपचंद परदेशी<br>लोन अकाउंट नंबर :<br>HJAL22000028564 | मालमत्ता येथे स्थित – जीपीएच नं. ६९९, कसमपुरा, लँडमार्क हनुमान मंदिराजवळ, ता. पाचोरा, महाराष्ट्र – ४२४२०१, प्लॉट एरिआ – १८५.८७ चौ.मी. बिल्ट–अप एरिआ – ७६.६३ चौ.मी. त्यावरील सद्य व भावी सर्व बांधकामासह, उक्त जमीन पुढीलप्रमाणे सिमित– चार सीमा : दक्षिण – रोड व वापर, पश्चिम – संजय रुपचंद सराणा, उत्तर – शितल लोधा यांचा प्लॉट, पूर्व – संजय भगतसिंह राजपूत. | १. १५.०५.२०२६<br>२. १४.०५.२०२६<br>३. रु. ७,८०,४४९/– (रुपये सात लाख ऐंशी हजार चारशे एकोणपन्नास फक्त) १४–मे–२०२६ रोजीप्रमाणे थकित |

* प्रदान आणि/ किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत निघालेले आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ., वर नमूद केलेल्या संबंधित दिनांकित मागणी सूचनेमध्ये अधिक सविस्तररीत्या नमूद केलेले पुढील व्याज, दरातील अतिरिक्त व्याज यासह. जर उक्त बंधनकारक वर नमूद केल्यानुसार "**जेएमएफएचएलएल**"ला रकमेचे प्रदान करण्यास असमर्थ ठरल्यास, तर "**जेएमएफएचएलएल**" किंमत व परिणामाच्या अनुसार उक्त बंधनकारक/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधींच्या पूर्णतः जोखीमीवर उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) आणि लागू रुल्सअंतर्गत वरील सुरक्षित मत्ता/ स्थावर मालमत्तेच्या अनुसार प्रक्रिया सुरू करील.

उक्त बंधनकारक/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधींना "**जेएमएफएचएलएल**"च्या लेखी पूर्व–परवानगीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने, पूर्वोक्त सुरक्षित मत्ता/ स्थावर मत्तेच्या हस्तांतरणाकरिता उक्त ॲक्टअंतर्गत प्रतिबंधित केले आहे. कोणतीही व्यक्ती ॲक्ट किंवा त्याखालील तयार केलेल्या रुल्सच्या तरतूदींचे उल्लंघन करील किंवा उल्लंघनास प्रोत्साहन देईल, ती ॲक्टअंतर्गत तरतूद केल्यानुसार कारावास आणि/ किंवा दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

**स्थळ :** औरंगाबाद/ जळगाव
**दिनांक :** २१.०५.२०२६

**स्वाक्षरी/–प्राधिकृत अधिकारी**
**जेएम फायनान्शियल होम लोन्स लिमिटेड**

---

## TJSB SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED BANK

**नोंदणीकृत कार्यालय :** टीजेएसबी हाऊस, प्लॉट नं. बी–५, रोड नं. २, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४.
**फोन :** २५८७८५००
**नाशिक वसुली कार्यालय :** शॉप नं. १/२, केसर प्लाझा अपार्टमेंट, माऊली लॉन्स जवळ, डीजीपी नगर, अंबड, नाशिक – ४२२०१०.
**फोन :** ०२५३–२३७४३५१

### ताबा नोटीस (स्थावर मालमत्तेकरिता)

**सरफेसी कायदा २००२ मधील तरतुदीनुसार वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स २००२ च्या रूल ८(२) अंतर्गत**

ज्याअर्थी खाली सही करणार **टीजेएसबी सहकारी बँक लि. चे** प्राधिकृत अधिकारी यांनी, **दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (''थोडक्यात सरफेसी ॲक्ट, २००२'')** च्या सेक्शन १३(१२) सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार/जामीनदार /गहाणखतदार यांना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या तारखेला मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीस मिळालेल्या तारखेपासून **६०** दिवसांच्या आत परत करावी. परंतू कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या **सेक्शन १३(४) आणि सेक्शन १४ सरफेसी रुल्स २००२** च्या **रूल ८ अंतर्गत** प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार यांच्या नावासमोर नमूद केलेल्या गहाण मालमत्तेचा खाली नमूद केलेल्या तारखेला **प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.**

विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **टीजेएसबी सहकारी बँक लि.** यांना खाली नमूद केलेल्या येणे असलेल्या रक्कमेच्या अधीन राहील.

**सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.**

| कर्जदार/जामीनदार/गहाणखतदारांची नावे आणि शाखेचे नाव व खाते क्रमांक | मागणी नोटीस आणि थकीत रक्कम | ताबा घेतल्याची तारीख आणि प्रकार | मालमत्तांचा तपशील |
|---|---|---|---|
| १. मे. राजेंद्र ॲग्री प्रॉडक्टस् प्रा. लि.<br>प्रा. लि. कंपनीच्या संचालकांमार्फत–<br>i) श्री. करवा सुशिल जयनारायण<br>ii) श्री करवा आशिष सुभाष<br>iii) सौ. करवा सुधा सुशिल ....कर्जदार<br>२) श्री. करवा सुशिल जयनारायण ....संचालक व जामीनदार<br>३) सौ. करवा सुधा सुशिल ....संचालक व जामीनदार<br>४) श्री. करवा आशिष सुभाष ....संचालक व जामीनदार<br>५) श्री. करवा विष्णू जयनारायण .....जामीनदार<br>६) श्री. करवा मनिष जयनारायण .....जामीनदार<br>७) मे. कृषीधन सीडस् प्रायव्हेट लि. संचालक व अधिकृतांच्या सहीमार्फत<br>श्री. करवा सुशिल जयनारायण .....गहाणखतदार/जामीनदार<br>एनआरओ वसुली विभाग :<br>कर्ज खाते क्र.: 086130100000005 | मागणी नोटीसीची तारीख: २१/१०/२०२४<br>दि. ३०/०९/२०२४ पर्यंतची थकीत रक्कम रु. १०,५५,८६,३५५.०४ (अधिक त्यावरील व्याज व शुल्कासह) | दि. २०/०५/२०२६<br>ठिकाण : जठार पेठ, अकोला<br>(प्रत्यक्ष ताबा) | रहिवासी प्लॉट नं. ५४, ५७, ५८, ६६ व ७० चा सर्वसामाईक भाग, प्लॉटचे क्षेत्रफळ २४५४.१९ चौ. फू. प्रत्येकी, प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ १२,२७०.९५ चौ. फू. त्यावरील भविष्यातील बांधकाम/ विकासासहीत, सीटीएस नं. ६०, ६१, ६२ आणि ७४, जठार पेठ, रेल्वे स्टेशनजवळ, अकोला, ता. व जिल्हा अकोला येथे स्थित, आणि सामाईक **चतु:सीमा** खालील प्रमाणे– **पूर्वेस :** रस्ता, **पश्चिमेस :** रेल्वे ट्रॅक, **दक्षिणेस :** इतर मालकांचे रहिवासी प्लॉटस्, **उत्तरेस :** रस्ता |

**दिनांक :** २०/०५/२०२६
**ठिकाण :** जालना

प्राधिकृत अधिकारी,
सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत टीजेएसबी सहकारी बँक लि. साठी आणि त्यांच्या वतीने

---

## एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

AU SMALL FINANCE BANK — A SCHEDULED COMMERCIAL BANK

**अनुसूचित व्यावसायिक बँक**
**नोंदणीकृत कार्यालय : १९-अ, धुळेश्वर गार्डन, अजमेर रोड, जयपूर - ३०२००१ (सीआयएन: एल३६९११आरजे१९९६पीएलसी०११३८१)**

### सिक्युरिटायजेशन कायदा, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना

कर्ज खाते एनपीए झाल्यामुळे म्हणून अधिकृत अधिकारी, 'सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२'च्या कलम १३(२) अंतर्गत रकान्यात दिल्याप्रमाणे कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणारे/जामीनदार (एकत्रितपणे 'कर्जदार' म्हणून ओळखले जाणारे) यांना ६० दिवसांची मागणी सूचना जारी केली होती. सूचनेनुसार जर कर्जदारांनी संपूर्ण रक्कम ६० दिवसांच्या आत जमा केली नाही, तर खाली दिलेली गहाण मालमत्तेच्या / तारण मालमत्तेच्या लिलावातून रक्कम वसूल केली जाईल. म्हणून, कर्जदारांना सूचित केले जाते की, त्यांनी कर्जाची संपूर्ण रक्कम, भविष्यातील व्याज आणि खर्चासह, मागणी सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत जमा करावी, अन्यथा सदर निर्देशित कायद्याच्या कलम १३(४) आणि कलम १४ च्या तरतुदींनुसार, अधिकृत अधिकारी खाली दिलेली गहाण मालमत्ता/तारण मालमत्तेचा विक्रीसाठी ताबा घेण्यास स्वतंत्र आहे.

कर्जदारांनी हे लक्षात ठेवावे की, सदर ही सूचना मिळाल्यानंतर, निर्देशित कायदा, २००२ च्या कलम १३(१३) यानुसार, सुरक्षित धनकोच्या पूर्व लेखी संमतीशिवाय तुम्हाला सुरक्षित मालमत्तेपैकी कोणतीही विक्री, भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे आणि प्रतिबंधित केले आहे. कर्जदारांचे लक्ष सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३(५) सहवाचता निर्देशित कलम १३(८) याकडे वेधण्यात येत आहे, लिलाव सूचना प्रकाशित होण्यापूर्वी खाली नमूद केलेल्या संपूर्ण थकबाकीच्या देयकाच्या भरपाईनंतर कर्जदारांना त्यांची सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्याचा अधिकार असेल, जी त्यानंतर अस्तित्वात राहणार नाही.

| कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणारे/ जामीनदार यांचे नाव/कर्ज खाते क्र. | कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|
| **(कर्ज खाते क्र.) एल९००१०६०१२१३७३१८५,**<br>एम/एस माँ संतोषी प्रोव्हिजन (कर्जदार),<br>अनिल हुंडराजमल छाबडीया (सह-कर्जदार)<br>श्रीमती अंजू अनिल छाबडिया (सह-कर्जदार) | दि. १७-मार्च-२६<br>रु. ९,८९,९३९/- रु. नऊ लाख एकोणनव्वद हजार नऊशे एकोणचाळीस फक्त दि. १२-मार्च-२६ रोजीनुसार | येथे स्थित मालमत्ता - अ.क्र. १७६ बी ए, प्लॉट क्र. ३८, येथे स्थित भुसावळ, जिल्हा- जळगाव, महाराष्ट्र, ४२५२०१. **मोजमापे ६९.३९ चौरस मीटर** |

**दिनांक : २०.०५.२०२६**
**ठिकाण : जळगाव, महाराष्ट्र**

**अधिकृत अधिकारी**
**एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

---

## ताबा सूचना

### एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

**CIN : U67100MH2007PLC174759**
**रिटेल सेन्ट्रल व नोंदणीकृत कार्यालय**: एडलवाईस हाऊस, सीएसटी रोडलगत, कलिना, मुंबई– ४०००९८.
**परिशिष्ट IV [रुल–८(१)] ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी, यात खाली नमूद केलेल्या सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारीनी, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ॲक्ट), २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या (रुल ३) यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२)अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणकोंवर फर्माविणारी याखाली नमूद केल्यानुसार मागणी सूचना निर्गमित केली आहे.

त्यानंतर, यामधील नमूद केलेल्या अभिहस्तांकनकर्त्याने **एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड**कडे (यापुढे **''ईएआरसी''** म्हणून संदर्भित) आणि तिच्या याखाली नमूद केलेल्या न्यासाचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत स्वतः/ कार्यरत असलेली सुद्धा, वित्तीय मत्ता अभिहस्तांकित केली आहे. सरफेसी ॲक्ट, २००२च्या सेक्शन ५ अंतर्गत अभिहस्तांकन करारनाम्याच्या अनुसार **''ईएआरसी''**ने अभिहस्तांकनकर्ता म्हणून कार्यभार हाती घेतला आहे आणि याखाली नमूद केलेले सुरक्षा हित, हमी, प्रतिज्ञा यासह वित्तीय मत्तेच्या बाबत अभिहस्तांकनकर्त्याचे सर्व हक्क, नामाधिकार व हित ऋणकोद्वारा लाभ घेतलेल्या वित्तीय साहाय्याबाबत **''ईएआरसी''**मध्ये निहित करण्यात आले आहेत आणि **''ईएआरसी''** सुरक्षित धनको म्हणून सर्व हक्कांचे निष्पादन करीत आहे.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, **एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड**चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारानी प्रत्येक मालमत्तेच्या अनुसार नमूद केलेल्या तारखेदिवशी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या रुल ८ यासह वाचलेल्या ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब–सेक्शन (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखालील वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

| अ. क्र. | लोन अकाऊंट नंबर व ऋणको/ सह–ऋणकोचे नाव | मागणी सूचना तारीख व रक्कम | ट्रस्ट तपशील | ताब्याची तारीख | सांकेतिक/ प्रत्यक्ष ताबा |
|---|---|---|---|---|---|
| १ | लोन अकाऊंट नंबर: ६७१५५५ व ३६९९५६<br>१) दिनेश सूर्यकांतराव रेवणकर (ऋणको)<br>२) मिनाक्षी दिनेश रेवणकर (सह–ऋणको) | रु. ७६,६७,३८४.६३ पै. व ०२.०८.२०२१ | ईएआरसी ट्रस्ट एससी–४१० व एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (एचडीबीएफएसएल) | १८.०५.२०२६ | प्रत्यक्ष ताबा |

**मालमत्तेचे वर्णन**: पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे– मालमत्ता धारण केलेला फ्लॅट नं. ०२, मोजमापाचा बिल्ट–अप एरिआ ६० चौ.मी., तळमजला, ''मुथियन विहार'', सीटीएस नं. १६२८१/१-ए/२ यावर बांधकाम केलेले, दिशा फ्लॅट ओनर्स को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., ज्योतीनगर, औरंगाबाद आणि **पुढीलप्रमाणे सीमित: पूर्वेच्या दिशेने**: फ्लॅट नं. ०७, **पश्चिमेच्या दिशेने**: फ्लॅट नं. ०१, **उत्तरेच्या दिशेने**: नाला, **दक्षिणेच्या दिशेने**: रोड.

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब–सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत. विशेषकरून ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार याखाली नमूद केलेली रक्कम व त्यावरील व्याज या रकमेकरिता **एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

**स्थळ:** औरंगाबाद
**दिनांक:** २१.०५.२०२६

**स्वाक्षरी/– प्राधिकृत अधिकारी**
**एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड**

Edelweiss Asset Reconstruction

---

## सीएलसी इंडस्ट्रीज लिमिटेड

सीआयएन: L74899MH1991PLC457161
**नोंदणीकृत कार्यालय:** ३१८, एन-३, सिडको, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र, भारत, ४३१००१
**वेबसाइट:**www.clcindia.com; **ईमेल आयडी:**companysecretary@clcindustries.com;**फोन नं.:** 0240-6608636

**३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठीचे स्वतंत्र लेखापरीक्षित आर्थिक निकालांचे विवरण**

(प्रति शेअर डेटा वगळता ₹ लाखांमध्ये)

| Particulars | तिमाही संपली | | | वर्ष संपले | |
|---|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०२६ लेखापरीक्षित | ३१.१२.२०२५ लेखापरीक्षित | ३१.०३.२०२५ लेखापरीक्षित | ३१.०३.२०२६ लेखापरीक्षित | ३१.०३.२०२५ लेखापरीक्षित |
| ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | ४,७०३ | ३,२५३.१३ | ५,६७५.२३ | ४०,१९६.५७ | ७,२०७.८५ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण बाबींपूर्वी) | (२.१२) | (४९२.७२) | (४०७.१४) | (८७६.४८) | ८१.८५ |
| कर आकारण्यापूर्वीच्या कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | (२.१२) | (४९२.७२) | (५,११३.८१) | (८७६.४८) | (४,६२४.८२) |
| कर आकारणीनंतर कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | - | - | - | - | - |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (ज्यात कालावधीसाठी नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) यांचा समावेश आहे) | (२.५०) | (४९२.४९) | (५,११३.७८) | (८७६.०६) | (४,६२४.७८) |
| भरणा केलेले इक्विटी शेअर भांडवल (प्रति शेअर ₹ १०/- दर्शनी मूल्य) | १,०३९.४७ | १,०३९.४७ | १,०३९.४७ | १,०३९.४७ | १,०३९.४७ |
| मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शवल्यानुसार राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | - | - | - | (९१४.५९) | (३८.५२) |
| प्रति इक्विटी शेअर उत्पन्न – चालू कामकाज – मूलभूत आणि डायल्यूटेड (₹ १०/- चे) | (०.०२) | (४.७४) | (४९.२०) | (८.४३) | (४४.४९) |

**टीपा:**

1. वरील उतारा हा, सेबी (लिस्टिंग आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या, ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठीच्या स्वतंत्र लेखापरीक्षित आर्थिक निकालांच्या तपशीलवार नमुन्याचा एक भाग आहे. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठीच्या स्वतंत्र लेखापरीक्षित आर्थिक निकालांचा संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. www.nseindia.comआणि www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाइट (www.clcindia.comयेथे दिलेला QR कोड स्कॅन करून त्याच गोष्टी मिळवता येतील.
2. वरील आर्थिक निकालांचे कंपनीच्या लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन करून शिफारस केली आणि संचालक मंडळाने दिनांक -२०.०५.२०२६ रोजी झालेल्या त्यांच्या सभेत त्यास मंजुरी दिली.

**संचालक मंडळाच्या वतीने**
**सीएलसी इंडस्ट्रीज लिमिटेड**
**सही/-**
**भूपेंद्र सिंह राजपाल**
**अध्यक्ष**
**डीआयएन: ००३११२०२**

ठिकाण : छत्रपति संभाजीनगर
दिनांक: २०.०५.२०२६

---

## मुथूट होमफिन (इंडिया) लि.

Muthoot Homefin

कॉर्पोरेट कार्यालय: युनिट क्र. १९-एनई, एकोणविसावा मजला, दि रुबी, सेनापती बापट मार्ग, रुपारेल कॉलेजजवळ, दादर (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र – ४०० ०२८.

### मागणी सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ३(१) सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ मधील अनुच्छेद १३(२) अंतर्गत.

निम्नस्वाक्षरीकार हे सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सदर अधिनियम) अंतर्गत मुथूट होमफिन (इंडिया) लि. (एमएचआयएल) चे प्राधिकृत अधिकारी आहेत. सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केल्या ज्यांत पुढील कर्जदारांना ("सदर कर्जदार") त्यांना पाठविण्यात आलेल्या व खाली देण्यात आलेल्या संबंधित सूचनांमध्ये नमूद रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

वरीलच्या संदर्भात सदर कर्जदारांना पुन्हा एकदा सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत सदर कर्जदारांनी तयार केलेल्या इतर दस्तावेज/लेखांसह वाचण्यात येणाऱ्या कर्ज करारांतर्गत देय असलेल्या खाली नमूद रकमांची खाली नमूद दिनांकापासून भरणा किंवा वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या सदर मागणी सूचनांमध्ये वर्णन करण्यात आल्यानुसार दरमहा २% दराने पुढील व्याजासह परतफेड करावी. सदर कर्जाच्या परतफेडीची हमी म्हणून सदर कर्जदारांनी एमएचआयएलकडे अनुक्रमे पुढील मत्ता तारण म्हणून ठेवलेल्या आहेत.

| अ. क्र. | कर्जदार/सह-कर्जदार / जामीनदाराचे नाव / कर्ज खाते क्र./शाखा | एकूण थकबाकी रक्कम (रु.) | मागणी सूचनेचा दिनांक | अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) |
|---|---|---|---|---|
| १ | मुकेश शंकर पाटील /<br>शीतल मुकेश पाटील /<br>JAL-NHL-001500/जळगाव | रु. ६,९१,३०९/–<br>(रुपये सहा लक्ष एक्याण्णव हजार तीनशे नऊ फक्त) | २४–एप्रिल–२०२६ | लामांजन, नोंदणी विभाग, तालुका व जिल्हा जळगाव, ग्रामपंचायत लामांजनच्या स्थानिक हद्दीत, ग्रामपंचायत घर क्र. २६, क्षेत्रफळ सुमारे ८५० चौ.फू., लामांजन, तालुका व जिल्हा जळगाव. पूर्वेस–रस्ता, पश्चिमेस–रमेश जगन पाटील यांची मालमत्ता, उत्तरेस–विकास हरचंद पाटील यांची मालमत्ता, दक्षिणेस–शांताराम तोताराम पाटील यांची मालमत्ता. |
| २ | संतोष भगवान तिवारी /<br>विशाल संतोष तिवारी /<br>JAL-NHL-001534/जळगाव | रु. १९,१९,८०७/–<br>(रुपये एकोणवीस लक्ष एकोणवीस हजार आठशे सात फक्त) | २४–एप्रिल–२०२६ | मालमत्तेचे वर्णन (चतु:सीमासह): शिरसोली प्र.ब., नोंदणी विभाग, तालुका जळगाव व जिल्हा जळगाव, ग्रामपंचायत शिरसोली प्र.ब.च्या स्थानिक हद्दीत, प्लॉट क्र. ९०, क्षेत्रफळ सुमारे १६०.०० चौरस मीटर, त्यावरील ३ ब्लॉकचे बांधकाम, त्यापैकी पूर्वेकडील ब्लॉक क्र. १ क्षेत्रफळ सुमारे ५३.३४ चौ.मी. (५७४.०८ चौ.फू.), बिल्ट–अप क्षेत्रफळ सुमारे ५३.३४ चौ.मी. चतु:सीमा: पूर्वेस–प्लॉट क्र. ८९, पश्चिमेस–सदर प्लॉटचे ब्लॉक घर, उत्तरेस–१२ मीटर रुंद रस्ता व वापर, दक्षिणेस–गट क्र. २२६. |
| ३ | सागर सोमनाथ पाटील /<br>दिपाली सागर पाटील /<br>DHU-HL-000030/धुळे | रु. २१,८७,२५८/–<br>(रुपये एकवीस लक्ष सत्त्याऐंशी हजार दोनशे अठ्ठावन्न फक्त) | २४–एप्रिल–२०२६ | सर्व्हे क्र. १९२/५+६, त्यापैकी प्लॉट क्र. २९, एकूण क्षेत्रफळ – ५७० चौ.मी., त्यामधील दक्षिणेकडील रो हाऊस क्र. ४, क्षेत्रफळ ९६.७५ चौ.मी. सोबत तेथील सुमारे ६७ चौ.मी. बिल्ट–अप क्षेत्रफळ असलेले आरसीसी बांधकाम असलेले घर आणि उर्वरित मोकळी जागा, टाकळी प्र. चा. ता. चाळीसगाव, जि. जळगाव. चतु:सीमा: पूर्वेस – प्लॉट क्र. २९ मधील सामायिक रस्ता, पश्चिमेस – प्लॉट क्र. २८, दक्षिणेस – रो हाऊस क्र. ३, उत्तरेस – रो हाऊस क्र. ५. |
| ४ | आत्माराम माणिकराव वाघ /<br>रुपाली आत्माराम वाघ /<br>017-01700383/संभाजीनगर | रु. ३,१४,००४/–<br>(रुपये तीन लक्ष चौदा हजार चार फक्त) | २४–एप्रिल–२०२६ | प्लॉट क्र. २९–अ, क्षेत्रफळ सुमारे ४८.७९ चौ.मीटर, गट क्र. ११, मयूरनगर, वडगाव कोल्हाटी, ता. व जि. औरंगाबाद. चतु:सीमा: पूर्वेस – २० फुटी रस्ता, पश्चिमेस – प्लॉट क्र. ११, दक्षिणेस – प्लॉट क्र. ३०, उत्तरेस – प्लॉट क्र. २९ चा उर्वरित भाग. |
| ५ | अजय राजेंद्र टाक /<br>वर्षा अजय टाक /<br>राजेंद्र एकनाथ टाक /<br>017-01700501/संभाजीनगर | रु. १,६१,१४७/–<br>(रुपये एक लक्ष एकसष्ट हजार एकशे सत्तेचाळीस फक्त) | २४–एप्रिल–२०२६ | मालमत्तेचा पत्ता: प्लॉट क्र. ११५/दक्षिणेकडील भाग, क्षेत्रफळ सुमारे ३००.०० चौ.फू., मिळकत क्र. ५२२८/१, गट क्र. १०/१, मौजे वडगाव कोल्हाटी, ता. व जि. औरंगाबाद. उत्तरेस – प्लॉट क्र. ११५ उत्तरेकडील भाग, दक्षिणेस – प्लॉट क्र. ११६, पूर्वेस – प्लॉट क्र. १३२, पश्चिमेस – ६ मी. रस्ता. |

सदर कर्जदारांनी एमएचआयएलकडे वर नमूद केल्यानुसार भरणा न केल्यास एमएचआयएलद्वारे सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(४) आणि लागू नियमांतर्गत वरील अनामत मत्तांविरुद्ध संपूर्णपणे कर्जदारांच्या खर्चावर व त्यांना भोगाव्या लागणाऱ्या परिणामांवर कारवाई करण्यात येईल.

सदर अधिनियमांतर्गत सदर कर्जदारांना वर नमूद मत्तांचे एमएचआयएलच्या लेखी पूर्व-परवानगीशिवाय विक्री, भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही पद्धतीने हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येतो. कोणत्याही व्यक्तीने सदर अधिनियमाचे किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा तसे करण्यास चिथावल्यास ती व्यक्ती सदर अधिनियमांतर्गत तरतूद केल्यानुसार कारावास आणि/किंवा दंडास पात्र असेल.

**दिनांक: २१ मे, २०२६**
**स्थान: जळगाव, औरंगाबाद**

**स्वा/–, प्राधिकृत अधिकारी**
**मुथूट होमफिन (इंडिया) लिमिटेड**